**रे.के.नं. १३८/२०२४**

**नि.क्र. ३४/क**

अभियोगपक्षातर्फे साक्षीदार क्र.४ याची जबानी

मी याद्वारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो की,

| | | |
|---|---|---|
| माझे नाव | - | मनिषा शैलेश म्हात्रे |
| वय | - | ३८ वर्षे |
| व्यवसाय | - | घरकाम |
| राहणार | - | मुळेखंड तेलीपाडा |

**सरतपासणी अभियोगपक्षातर्फे सहा. सरकारी अभियोक्ता श्रीमती शितल पवार यांच्यामार्फत...**

१. घटना ही दिनांक ०७.०४.२०२४ रोजी सकाळी ११.३० ते ११.४५ च्या सुमारास माझे घरी घडली होती. त्यावेळी माझे पती शैलेश नाष्टा करत असताना भिंतीजवळ खड्डा खोदत असल्याचा अवाज आल्याने त्यांनी खिडकीजवळ पाहिले असता संतोष नारायण म्हात्रे हा भिंतीलगत खड्डा खोदत असल्याचे त्यांना दिसले. तेंव्हा त्यांनी संतोष याला खड्डा भिंतीलगत खोदू नको, बाजूला घे असे म्हटले. तेंव्हा नारायण म्हात्रे यांनी येउन शिवीगाळ सुरूवात केली व घरात दगड व विटा फेकण्याची सुरूवात केली. त्यामुळे आम्ही बाहेर जाउन समजवण्याचा प्रयत्न केला असता नारायण याने लाकडी दांडक्याने माझे पतीला सुरूवात केली. त्यानंतर संतोष म्हात्रे यांने माझ्या पतीच्या डोक्यात लोखंडी पहार मारली. त्यानंतर महेंद्र म्हात्रे याने माझे पतीला खाली पाडून लाथा बुक्यांनी मारण्यास सुरूवात केली. मी व माझ्या दिराने

समजवण्याचा प्रयत्न केला. त्यानंतर माझया दिराने माझे पतीला पोलिस ठाण्यात नेले. व तेथून त्यांना सरकारी दवाखान्यात पाठवले. मी त्या दवाखान्यात नंतर गेले होते. त्यांनतर माझे पतीने पोलिस ठाण्यात जाउन तक्रार दिली होती. आरोपींना पाहिल्यास मी ओळखू शकतो. आजरोजी न्यायालयात आरोपी संतोष व महेंद्र न्यायालयात हजर आहेत. ज्या लाकडी दांडक्याने व पहारीने आरोपीने माझे पतीला मारले ते दाखवल्यास मी ओळखू शकते. आता मला भौतिक वस्तू क्रमांक  अ वरील लाकडी दांडका व भौतिक वस्तू ब वरील पहार दाखवली. आरोपीने ज्या दांडक्याने व पहारीने माझे पतीला मारले होते ते हेच आहेत.

## उलटतपास आरापीचे वकील श्री योगेश गांगन   यांच्यामार्फत...

२. हे म्हणणे खरे आहे की, घटनेच्या दिवशी माझे माझ्या पतीसोबत चांगले संबंध होते.  हे म्हणणे खरे  आहे की, कोणी पती किंवा नातेवाईकास मारहाण केल्यास पोलिस ठाण्यात जाउन तक्रार द्यावी लागते किंवा जबाब द्यावा लागतो याची मला माहिती आहे. दिनांक ०७.०४.२०२४ च्या घटनेनंतर पोलिस माझे घरी चौकशीसाठी आले होते. ते घटनेनंतर त्याच दिवशी संध्याकाळी आले होते. हे म्हणणे खरे आहे की, घटनेच्या दिवशी पोलिसांना मी कोणताही जबाब दिला नाही. हे म्हणणे खरे नाही की, त्यानंतर सुध्दा पोलिस माझे घरी चौकशीसाठी आले होते. पोलिस घटनेच्या दिवशी संध्याकाळच्या वेळात माझी घरी आले होते. मी पोलिसांना दिनांक १२.०६.२०२४ रोजी जबाब दिला.

प्रश्न एप्रिल व मे महिन्यात तुम्ही पोलिस ठाण्यात जाउन जबाब दिला नाही?

उत्तर पोलिसांनी बोलवलेच नाही.

हे म्हणणे खरे आहे की, मला जबाबासाठी बोलवले असता माझे पतीने दाखल केलेल्या फिर्यादसाठी मला व माझ्या दिराला साक्षीदार म्हणून निवडल्याचे सांगितले. हे म्हणणे

खरे आहे की, माझा जबाब नोंदवण्याच्या अगोदर पोलिसांनी मला फिर्याद बदलची माहिती दिली. हे म्हणणे खरे आहे की, त्या माहितीच्या आधारे मी पोलिसांना जबाब दिला. हे म्हणणे खरे आहे की, मी तो जबाब वाचून व समजून तो पुरावा देत आहे. हे म्हणणे खरे आहे की, घटनेच्या आधीपासून आरोपीसोबत आमचे किरकोळ वाद आहेत. हे म्हणणे खरे नाही की, त्या वादामुळे मी आजरोजी न्यायालयासमोर साक्ष देत आहे. माझा जबाब नोंदवला तेंव्हा पोलिसांनी मला भौतिक वस्तू क्रमांक अ व ब तसेच क्रमांक वरील लाकडी दांडा व पहार ओळखण्यासाठी दाखवले नव्हते. हे म्हणणे खरे नाही की, मी सरतपासातील मजकूर खोटा सांगितला आहे. हे म्हणणे खरे नाही की, आरोपींनी माझ्या पतीला कधीही शिवीगाळ केली नाही व मारहाण केली नाही. हे म्हणणे खरे नाही की, माझे पतीने दाखल केलेले फिर्याद खोटी असल्याचे माहित असल्याने मी दोन ते अडीच महिने जबाब देण्यास गेले नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पुर्ण.**

**फेरतपास नाही.**

**श्रवणोत्तर स्विकृत**

सही/-

**उरण**, **(एस. पी. वानखडे)**

दिनांक – २०/१२/२०२५ न्यायदंडाधिकारी प्र. वर्ग, उरण

न्यायालय क्र. २